पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ५**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. ४/५/२०२१** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

मा.सभासदांचे प्रस्ताव

विषय क्र. १०६

मा.सौ.ज्योती कळमकर यांचे दि. २२/४/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र.९ ब बाणेर हॉटेल सदानंद ते ननावरे अंडरपास, हायवेची पूर्व बाजू, सर्व्हिस रोड सुशोभिकरण करणे, झाडे लावणे, माती टाकणे, पाण्याची व्यवस्था करणे इत्यादीसाठी र.रु.५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| प्रभाग क्र.९ ब, आयव्हरी इस्टेट बाणेर येथील रस्ता डांबरीकरण करणे, सीई२०ए१०२/एसए२-१०३० | ५० लाख | -- |
| नविन सुचविलेले काम | | |
| प्रभाग क्र.९ ब बाणेर हॉटेल सदानंद ते ननावरे अंडरपास, हायवेची पूर्व बाजू, सर्व्हिस रोड सुशोभिकरण करणे, झाडे लावणे, माती टाकणे, पाण्याची व्यवस्था करणे इत्यादी. | -- | ५० लाख |

विषय क्र. १०७

मा.सौ.रेखा टिंगरे यांचे दि. २८/४/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र.१ क (कळस-धानोरी) मधील विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन देखभाल दुरुस्तीची कामे करणे, गाडलेले चेंबर वर घेणे, झाकण बदलणेसाठी र.रु.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक, पान क्र. ३३, कोड एक्सई२३अे११७/ एसएक्स२-९२, वॉर्ड १ सी प्रभाग क्र.१ क (कळस-धानोरी) मधील विविध ठिकाणी नाले साफसफाई करणे | १० लाख | -- |
| नविन सुचविलेले काम | | |
| प्रभाग क्र.१ क (कळस-धानोरी) मधील विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन देखभाल दुरुस्तीची कामे करणे, गाडलेले चेंबर वर घेणे, झाकण बदलणे | -- | १० लाख |

(टिप :- मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर सदर कामाचे टेंडर लावण्यात यावे.)

विषय क्र. १०८

मा.सौ.दिपाली धुमाळ, विरोधी पक्षनेत्या यांचे दि. २९/४/२०२१ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या विविध रुग्णालयात उदा. जम्बो कोविड सेंटर, सी.ओ ई.पी, दळवी हॉस्पिटल, जम्बो कोविड सेंटर बाणेर व इतर मनपाचे उभारण्यात आलेले छोटे मोठे कोविड सेंटर येथे हजारो रुग्ण उपचार घेत आहेत. गेल्या काही दिवसांपासून सदर रुग्णांना (Remdisivor, Tocilizmub, Actmera, Bevicra) हे इंजेक्शन डॉक्टर आणावयास सांगत असून सदर इंजेक्शन बाजारात कुठेही उपलब्ध होत नसून रुग्णांमध्ये व त्यांच्या नातेवाईकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. काही ठिकाणी हे इंजेक्शन अवास्तव दरात मिळत असून हि एक प्रकारे रुग्णांच्या नातेवाईकांची आर्थिक पिळवणूक आहे. रुग्णाचा जीव वाचविण्यासाठी चढ्या दरात (Remdisivor, Tocilizmub, Actmera, Bevicra) हे इंजेक्शन खरेदी करतात. सदर इंजेक्शन वेळेत न मिळाल्याने रुग्णांचा नाहक बळी जात आहे.

पुणे महानगरपालिकेने अनेक बाबी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) अन्वये कुठल्याही परवानगी शिवाय खरेदी केले आहेत, त्याच धर्तीवर (Remdisivor, Tocilizmub, Actmera, Bevicra) अशा प्रकारचे इंजेक्शन व औषधे सुद्धा मिळेल तिथे, मिळेल त्या कंपनीकडून ६७ (३) (क) अन्वये खरेदी करून तातडीने रुग्णांना उपलब्ध करून द्यावे.

## हिशोब तपासणी अहवाल

विषय क्र. १०९

कर आकारणी व कर संकलन खात्याकडील पेठ बोपोडी ए फॉर्म क्रमांक ४०११ सन २०१४–१५ मधील आकारणी प्रकरणांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/१३२ दि. २०/४/२०२१ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. १ सन २०२१–२०२२ चा विचारासाठी.

## सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स

विषय क्र. ११०

कार्यकारी अभियंता क्र. १ यांचे कार्यक्षेत्रात हडपसर भागात बांधीव इमारतीमध्ये कोविड केअर सेंटरची उभारणी करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.निलेश तरवडे कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५४,५१,९९९=५० पेक्षा ०१२.८०% कमी तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४७,५४,१४३=५६ किंवा उपलब्ध तरतुद रकमेपर्यंत काम करुन घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ६,५४,२३९=९४ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये ४२,४०२/– अधिक निविदा अटी शर्तीनुसार सिमेंट, स्टील या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रांनुसार फरक अदा/कपात करणेस त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/३७ दि.२८/४/२०२१ चे पत्र.

विषय क्र. १११

प्रभाग क्र. १६ (स्वीकृत नगरसेवक) मधील शाळा, दवाखाना, कमला नेहरु रुग्णालय, आरोग्य कोठी येथे रंगरंगोटी करणे, फर्निचर करणे व भवन विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.निखिल कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२,६४,४७,३१९=५० पेक्षा ०.४५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. २,६३,२८,३०६=५६२ पर्यंत अधिक जी.एस.टी. र.रुपये ३१,७३,६७८=३४ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग र.रु. २९,२९६/– अधिक निविदा अटी शर्तीनुसार सिमेंट, स्टील या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रांनुसार फरक अदा/कपात करणेस त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/३८ दि.२८/४/२०२१ चे पत्र.

## संकीर्ण

विषय क्र. ११२

पुणे शहरातील घरोघरी निर्माण होणाऱ्या वर्गीकृत कचऱ्याचे संकलन करणेकामी “स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था मर्यादित” या अशासकिय संस्थेबरोबर तीन महिन्यांसाठी तात्पुरती करारवाढ करणेकामी मा.स्थायी समिती मार्फत मा.महानगरपालिका सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घन.व्यव./२७ दि.२७/४/२०२१ चे पत्र.

विषय क्र. ११३

सन २०२०–२१ या अंदाजपत्रकामध्ये विविध सार्वजनिक संस्थांचे नावे मान्य झालेल्या देणगीची रक्कम अदा करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सा.प्र./१०००,दि.९/३/२०२१ चे पत्रावर झालेला विधी समिती सभा ठराव क्र. ४२ दि.३०/३/२०२१ विचारासाठी.

शिवाजी दौंडकर
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)